पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 04/01/2020 (शनिवार)
(दुपार)

---

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मौजा रोहणा येथे दिनांक 31/12/2019 चे 18.00 वा. दरम्यान अक्षय शेषराव भलावी, वय 23 वर्ष, रा. रोहणा ता.नरखेड, जि.नागपुर हा गावातील रोडवर बेशुध्द अवस्थेत मिळुन आला. त्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी लता मंगेशकर हॉस्पीटल, काटोल येथे त्यास उपचाराकरीता आणले असता उपचारा पुर्वी अक्षय भलावी याचा मृत्यू झाला. पो.स्टे. काटोल येथुन संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषराव केशवराव भलावी, रा. रोहणा, ता. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुरेश निमसडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मोहपा ते उबाळी रोडवर येथे दिनांक 31/12/2019 चे 10.00 वा. दरम्यान विजय चुनिलाल खजरे, वय 45 वर्ष, रा. खुरजगाव, ता सावनेर जि.नागपूर हे सावनेर वरून व मोहपा रोडने उबाळी येथे त्यांच्या दुचाकी गाडीने जात असतांना अचानक त्यांचे गाडीवर जनावर कुदल्याने ते गाडी सह खाली पडले. त्यामुळे विजय खजरे यांच्या डोक्याला उजवे बाजूला खाली मार लागुन गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय सावनेर व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे नेले असतांना दि. 31/12/19 चे 12:05 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक राजेन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार इस्माईल शेख हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर